मुख्य वन संरक्षक व क्षेत्र संचालक
पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर

संरक्षित क्षेत्र तसेच वनालगतच्या गावात होम स्टे निर्माण करण्याकरीता मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक:- डब्ल्युएलपी/०६१५/प्र.क्र.१८२/फ-१
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक:- २६ फेब्रुवारी, २०१६

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्य निसर्ग सौंदर्याने नटलेले असून विविध प्रकारची नैसर्गिक पर्यटन स्थळे आहेत. यामध्ये राज्यातील व्याघ्र प्रकल्प अतिशय महत्त्वाचे आहेत. ताडोबा/ पेंच /सहयाद्री /बोर/ मेळघाट व्याघ्र प्रकल्पांकडे दिवसेंदिवस देशी व विदेशी पर्यटकांचा ओघ वाढत आहे. तथापि, प्रत्येक ठिकाणी पर्यटकांची व्यवस्था करणे वन विभागास शक्य होत नाही. त्याचबरोबर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचेही पर्यटक निवास अपुरे पडत असून प्रत्येक व्याघ्र प्रकल्पाचे ठिकाणी मोठी गुंतवणूक करुन पर्यटन संकुले तयार करणे व त्याची देखभाल करण्याचा खर्च लक्षात घेता व्यवसायिक दृष्टया किफायतशीर होत नाही. तद्वतच इतर संरक्षित क्षेत्र व वनक्षेत्रात निसर्ग पर्यटनास असणारा वाव विचारात घेऊन अशा ठिकाणीही निवास व्यवस्था करने आवश्यक आहे.

निसर्ग पर्यटन अंतर्गत स्थानिक गावकऱ्यांच्या घर/वाडे यांच्यामधील अतिरिक्त खोल्या व घराच्या आवारातील मोकळया जागेचा वापर पर्यटकांसाठी राहण्याची सुविधा उपलब्ध करण्याकरिता केला जाऊ शकतो. पर्यटकांना लागणाऱ्या सर्व सोयी सुविधांचा विचार करुन अशा अतिरिक्त खोल्यांचे नूतनीकरण करणे व घरातील मोकळया जागेत सर्व सोयीसुविधायुक्त नवीन खोलीचे बांधकाम करणे आवश्यक आहे. याकरिता घरमालकास आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. सदरप्रमाणे आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन दिल्यास पर्यटकांसाठी माफक दरात राहण्याची सोय निर्माण होईल व स्थानिकांना रोजगार मिळेल. निसर्ग पर्यटनात स्थानिकांना अशा प्रकारे सहभागी करुन घेण्यास वाव आहे. निसर्ग पर्यटन माध्यमातून उपजीविकेचे साधन उपलब्ध करुन दिल्यास वन, वन्यजीव संवर्धन होण्यात स्थानिकांचा सहभाग प्राप्त होईल तसेच घर मालकाचे हित साध्य करता येईल.

होम स्टे ही संकल्पना निसर्ग पर्यटनांतर्गत प्रायोगिक तत्वावर राबवण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. होम स्टेच्या माध्यमातून संरक्षित क्षेत्रालगतच्या क्षेत्रात निसर्ग पर्यटनास प्रोत्साहन देण्याकरीता खालीलप्रमाणे सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

मार्गदर्शक सूचना :-

ही योजना सर्व संरक्षित क्षेत्र व प्रादेशिक वनक्षेत्राकरीता लागू राहिल.

लाभार्थी निवडीचे निकष

सदर योजनेच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य प्राप्त करण्याकरिता लाभार्थ्यांना खालील निकष पूर्ण करणे बंधनकारक आहे.

१. लाभार्थी / घर मालक त्या गावाचा रहिवासी असावा व त्याचे मागील १५ वर्षात त्या गावाच्या सतत वास्तव्य असावे.
२. लाभार्थी / घर मालकाचे उत्पन्नाचे प्रमुख साधन गावातच असावे.

३. घर मालकास पर्यटकांसाठी नवीन खोली बांधावयाची असल्यास घराचे बांधकाम क्षेत्र वगळून कमीत कमी २१० चौ. फू. जागा मोकळी असावी.

४. घर मालकास घरातील अतिरिक्त खोलीचे नूतनीकरण करुन पर्यटकाना उपलब्ध करुन द्यावयाची असल्यास सदर खोलीचे क्षेत्रफळ (शौचालय वगळता) कमीत कमी १२० चौ. फू.व कमीत कमी ३० चौ. फू.क्षेत्र Toilet Attached Bathroom बांधणेकरिता उपलब्ध असावे.

५. घर / वाड्यामध्ये स्वत: घरमालक राहत असावा.

६. अर्जदार / अर्जदाराच्या घरातील सदस्य कमीत कमी आठवी पास असावा.

७. अर्जदार / अर्जदाराच्या कुटुंबातील कुठल्याही व्यक्तीवर वन / वन्यजीव / फौजदारी कायद्या अंतर्गत कुठलाही गुन्हा सिध्द झालेला नसावा.

लाभार्थी निवडीची कार्यपद्धती

१. सदर योजनेसाठी लाभार्थी / घरमालकाची निवड करण्याचे अधिकार संबंधित वनक्षेत्राचे मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक /वन्यजीव ) व क्षेत्र संचालक / वनसंरक्षक (वन्यजीव) यांना राहतील. बफर क्षेत्रातील उपसंचालक / विभागीय वन अधिकारी / उप वनसंरक्षक हे सर्व अर्जदारांना गुणांकन देण्याची कार्यवाही पूर्ण करतील. गुणांकन देण्याची कार्यवाही पूर्ण झाले नंतर यादी क्षेत्र संचालक / मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक/ वन्यजीव ) / वनसंरक्षक (वन्यजीव) यांना सादर करण्यात येईल. सदर योजने करता निवड करावयाचे लाभार्थी यांची संख्येचे उद्दिष्ट लक्षात घेऊन सर्वाधिक गुणांकन असलेले लाभार्थी यांची निवड करण्यात येईल.

२. घर / वाड्यामधील अतिरिक्त खोली चे नुतनीकरण करणे करता व घराचे परिसरात नवीन खोलीचे बांधकाम करणे करिता प्राप्त झालेल्या अर्जांचे गुणांकन वेगळया पद्धतीने करण्यात येईल. गुणांकन करण्याचे निकष व कार्यपद्धती सोबतच्या परिशिष्टनुसार राहील.

आर्थिक बाबी विषयक तरतूद

१. होम स्टे प्रकल्पास लागणाऱ्या एकूण रकमेच्या २५ % रक्कम लाभार्थीस सुरुवातीस स्वत: गुंतवावी लागेल.

२. निवड केलेले लाभार्थी आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास लाभार्थ्यांच्या हिश्याची पूर्ती करण्यासाठी व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान / संयुक्त वनव्यवस्थापन समिती किंवा ग्रामपरिसर विभाग समिती ह्यांच्या स्वत:च्या उत्पन्नातून बिनव्याजी कर्ज स्वरुपात देता येईल त्यासाठी योग्य तो करारनामा करण्यात यावा.

३. घर / वाड्यामधील अतिरिक्त खोलीचे नूतनीकरण व फर्निशिंग करण्याकरिता आर्थिक सहाय्याची अधिकतम मर्यादा दीड लाख रुपये राहील. तसेच घर / वाड्यामधील मोकळया जागेत पर्यटकांसाठी नवीन खोली बनविण्याकरिता आर्थिक सहाय्याची अधिकतम मर्यादा तीन लाख रूपये राहील.

४. घर / वाड्यामधील अतिरिक्त खोलीचे नूतनीकरण व फर्निशिंग करणे अथवा घर / वाड्यामधील मोकळ्या जागेत पर्यटकांसाठी नवीन खोली बनविण्याबाबतचा आराखडा पंजीबद्ध वास्तु विशारद यांचेकडून संबंधित लाभार्थी यांना तयार करुन घेणे इष्ट राहील.

५. आर्थिक सहाय्य संबंधित लाभार्थ्यांस दोन टप्प्यांमध्ये देण्यात येईल. प्रथम टप्प्यात एकत्रित मंजूर अनुदानाचे ५० % रक्कम लाभार्थ्यांस काम सुरु होणेपूर्वी देण्यात येईल. दुसऱ्या टप्प्यात काम पूर्ण झाल्यावर उर्वरीत आर्थिक सहाय्य देण्यात येईल.

६. सदर शासन परिपत्रकातील मार्गदर्शक सूचना लाभार्थ्यास मान्य असल्याबाबत क्षेत्र संचालक/ संबंधित मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक/ वन्यजीव) ह्यांच्याशी करारनामा करणे बंधनकारक राहील. सदर करारनाम्यास क्षेत्र संचालक / मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक/ वन्यजीव) / वनसंरक्षक (वन्यजीव) मान्यता देतील.
७. होम स्टेचे दर संयुक्त व्यवस्थापन समिती / ग्राम परिस्थितीकीय विकास समिती क्षेत्र संचालक / मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक/ वन्यजीव) / वनसंरक्षक (वन्यजीव) हयांना प्रस्तावित करतील व क्षेत्र संचालक / मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक/ वन्यजीव) / वनसंरक्षक (वन्यजीव) दर अंतिम करतील.
८. आर्थिक सहाय्य घेऊन बांधलेले होम स्टेचा इतर दुसऱ्या प्रयोजनासाठी वापर करता येणार नाही. होम स्टेकरता दिलेल्या आर्थिक सहाय्याचा वापर होम स्टेकरता न केल्यास किंवा होम स्टेचा निधी इतर प्रयोजनासाठी वापर केल्यास दिलेले आर्थिक सहाय्य महसूल थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल अशी अट मंजूरी आदेशात नमूद करावी.
९. होम स्टेच्या मिळणा-या उत्पन्नापैकी ५% ग्राम परिस्थितीकीय विकास समिती व ५% व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान /वनविकास निधी हयांना देय राहील.

लाभार्थीचे कर्तव्य व जबाबदाऱ्या

१. सदर योजनेतील लाभार्थ्यांना त्यांचे होम स्टे महाराष्ट्र निसर्ग विकास मंडळ/ महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC)यांचे पर्यटकांसाठी निवास व न्याहरी अंतर्गत नोंदणीकृत करणे अनिवार्य राहील.
२. लाभार्थी यांनी त्यांचा होम स्टे परिसर स्वच्छ ठेवावा. मलेरिया डेंगुचे मच्छर परिसरात वास करणार नाही याची काळजी घ्यावी.
३. लाभार्थ्यांकडे राहणारे पर्यटकाची संपूर्ण माहिती व कायमचा पत्ता नोंद करून घेणे, पर्यटकांनी कोणत्याही प्रकारचे असभ्य वर्तन किंवा वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२, भारतीय दंड संहिता.. अंतर्गत गुन्हा ठरणारे कृत्य करू नये याबबात लाभार्थीना काळजी घ्यावी व तसे आढळल्यास तात्काळ त्याबाबत वन विभाग व पोलीस विभाग याना कळवावे.
४. होम स्टे तयार करण्यासाठी इतर कोणत्याही प्रकारची परवानगी, नाकृषक परवाना, नाहरकत दाखला जे नियमानूसार आवश्यक आहे. ते प्राप्त करण्याची जबाबदारी लाभार्थीची राहिल.
५. होम स्टेमध्ये पर्यटकांसाठी पलंग, गाद्या, टेबल, खुर्च्या, कपाट इत्यादी किमान साहित्य असणे आवश्यक आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्रवीण महाजन)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग.